# साउथ डाकोटा राज्यातील कॉर्न पॅलेस




कॉर्न पॅलेस (Corn Palace) म्हणजे मक्याच्या कणसांनी तयार केलेला राजवाडा. अमेरिकेतला हा प्रसिद्ध राजवाडा बघण्यासाठी मी, हे म्हणजे डॉ.अरुण प्रभुणे, मोठा मुलगा उदय, मोठी सून प्रज्ञा व दुसरा मुलगा सत्यव्रत असे आमचे तेव्हाचे पूर्ण प्रभुणे कुटुंब गेले होते.

खरे म्हणजे राजवाडा म्हटले की कोणत्यातरी राजाचा राजवाडा असतो. राजवाड्याच्या स्थितीवरून तो कोणत्या ऐश्वर्यसंपन्न राजाचा वाडा असावा याची आपण कल्पना करू शकतो. पण मी आज तुम्हाला ज्या राजवाड्यात घेऊन जाणार आहे तो आहे बिनराजाचा राजवाडा ! ऐकून आश्चर्य वाटलं ना ? अहो, हा खरंच राजवाडा आहे पण त्यात सध्या राजा राहत नाही आणि पूर्वीही कधी राहत नव्हता ! कारण हा राजवाडा कोणत्याही राजासाठी मुळी बांधलेलाच नव्हता ! हे माहिती असूनही हा जगप्रसिद्ध राजवाडा बघण्यासाठी जगभरातून दरवर्षी लाखो पर्यटक येतात !

मक्याच्या विविधरंगी कणसांनी बनवलेला हा सुंदर राजवाडा अमेरिकेच्या दक्षिण डाकोटा राज्यातील 'मिचेल' या गावात आहे. मका हे या राज्याचे मुख्य मूल्यवान पीक आहे. त्यामुळे हे मक्याचे पीक राजवाड्याच्या रूपात दिमाखात उभे आहे असे वाटते. लोकांना हा राजवाडा जणू आवाहन करतो, " या. तुम्ही या माझ्या सुपीक राज्यात या. माझ्यासाठी मेहनत करून मला खूप पिकवा आणि आनंदात राहा."

विमानाने नको, कारने जा ! :

आमचा मुलगा उदय याने इंडियानापोलिस या गावातील नोकरी सोडून कॅलिफोर्निया प्रांतातील सॅन होजे गावात नोकरी स्वीकारली होती. आम्ही विमानाने जाण्याचे ठरवत होतो. आम्ही अमेरिकेच्या पश्चिम किना-याकडे विमानाने जायचा विचार करतो आहोत हे कळल्यावर इंडियानापोलिसमधील

उदयचा अमेरिकन मित्र लॅरी याने आम्हाला खास सांगितले, " विमानाने जाऊ नका. पूर्व किना-यावरील न्यू यॉर्क ते पश्चिम किना-यावरील सॅनफ्रॅन्सिस्को या दोन महानगरांना जोडणारा नव्वद क्रमांकाचा राष्ट्रीय महामार्ग आहे. या महामार्गावरून एकदा तरी प्रवास करावा असे प्रत्येक अमेरिकनाचे स्वप्न असते. कारण अमेरिकेतला हा सर्वात सिनिक म्हणजे प्रेक्षणीय महामार्ग आहे. या महामार्गावर अमेरिकेतील बरीच महत्त्वाची प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. नॅशनल पार्क आहेत. हे सर्व तुम्हाला बघता येईल. तुम्हाला खर्च परवडतोय तर तुम्ही सामान ट्रकने पाठवा. आणि मस्त मजा करत वेगवेगळी स्थळं, गावं, राज्यं पाहात तुमच्या गावाला पोहचा. तुम्हाला छान वाटेल. खरी अमेरिका बघता येईल. विमानाने गेलात तर तुम्हाला हे काहीही बघता येणार नाही. म्हणून या महामार्गावरून तुम्ही कारने प्रवास करा. सगळं बघून झाल्यावर मग प्रवास कसा झाला, काय वाटलं ते मला सांगा."

त्याच्या या म्हणण्यावर आम्ही विचार केला आणि त्याप्रमाणे आठ-नऊ दिवसांचा प्लॅन तयार केला. त्या महामार्गावर कोणकोणती प्रेक्षणीय स्थळं आहेत याचा उदय व सत्यव्रत यांनी बारकाईने अभ्यास केला. व्यवस्थित वेळापत्रक तयार केले. मग आम्ही १५ जुलै २००२ ला या मोठ्या टूरवर निघालो.

१५ जुलैला ह्यांचा वाढदिवस असतो. तेव्हा हा पन्नासावा वाढदिवस जगप्रसिद्ध नायगरा धबधबा पाहून साजरा करता येतोय याचा आम्हा सर्वांनाच खूप आनंद झाला. ठरल्याप्रमाणे १५ जुलैला आम्ही नायगरा बघायला गेलो. पाहून तृप्त झालो. जगातील सात नैसर्गिक आश्चर्यांपैकी एक असलेले हे आश्चर्य पाहून धन्य झालो.

<u>कॉर्न पॅलेस : पक्ष्यांचा जगातला सर्वात मोठा अन्नदाता !</u> :

न्यू यॉर्क राज्यातील नायगरा पाहून झाल्यावर पुढचा टप्पा आमचा साउथ डाकोटा या राज्याचा होता. या राज्यात बघायला आम्हाला ब-याच गोष्टी होत्या. आमच्या मार्गात पहिल्यांदा लागणार होता कॉर्न पॅलेस अर्थात मक्याच्या कणसाचा राजवाडा. हा राजवाडा मिचेल (Mitchell) या शहरात आहे. तो आम्हाला बघायचा होता. त्याचे कारण असे होते की अमेरिकेमध्ये अन्यही काही कॉर्न पॅलेस होते किंवा आहेत. लोवा राज्यातील सिऑक्स सिटीत १८८७ - १८९१ या काळात कॉर्न पॅलेस अस्तित्वात होता; तर साउथ डाकोटा राज्यातच ग्रेगरी या गावातही असाच कॉर्न पॅलेस होता. असे असले तरी जगात प्रसिद्ध असलेला कॉर्न पॅलेस आहे तो साउथ डाकोटा राज्यातील मिचेल या शहरातला. सन १९२१ मध्ये पहिल्यांदा मिचेल येथला कॉर्न पॅलेस बांधला गेला.

साउथ डाकोटा राज्य हिवाळ्यात अति थंड. त्यामुळे हिवाळ्यात हा राजवाडा पर्यटकांसाठी बंद असतो. तेव्हा पक्षी, खारी यांना या कणसांची स्वादिष्ट मेजवानीच मिळते. म्हणून या कॉर्न पॅलेसला 'World's Largest Bird Feedar' अर्थात 'पक्ष्यांचा जगातला सर्वात मोठा अन्नदाता' या नावानेही ओळखले जाते.

<u>साउथ डाकोटा राज्यातच कॉर्न पॅलेस का बांधला ?</u> :

आम्हा सगळ्यांनाच हा विलक्षण राजवाडा बघण्याची फार उत्सुकता लागून राहिली होती. त्यात मला तर फारच. कारण मला मक्याची कणसं फार आवडतात. त्या कणसांचा राजवाडा बघायचा

म्हटला की मला 'असावा सुंदरसा चॉकलेटचा बंगला' हे गाणे आठवू लगले. चॉकलेट आवडणा-या मुलांना ते गाणे ऐकून असा खरंच चॉकलेटचा बंगला असेल तर कित्ती मज्जा येईल असे जसे वाटत असेल अगदी तस्से मला वाटत होते. मक्याच्या कणसांचा राजवाडा बांधावा असे कुणाला सुचले असेल ? केव्हा सुचले असेल ? का सुचले असेल ? इतकी कणसं कुठून आणली असतील ? हा मक्याच्या कणसांचा राजवाडा कसा दिसत असेल ? असे अनेक प्रश्न मनात येत होते. आमची कार वेगाने राजवाड्याकडे चालली होती. विचारही मनात वेगाने चालले होते. कधी एकदा मिचेल शहर येते आणि हा राजवाडा डोळ्यांनी बघतो असे आम्हाला झाले होते. कार कितीही वेगात असली तरी मला ती हळू चालली आहे असे वाटत होते आणि मी टूर बुक मधून कॉर्न पॅलेसच्या जन्माचा इतिहास उत्सुकतेने वाचीत होते. तेव्हाचा पॅलेस डोळ्यासमोर आणित होते. मनाने त्या काळात रमत होते.

डाकोटा राज्यातच हा कॉर्न पॅलेस का बांधावा वाटला यालाही एक कारण होते. ते भौगोलिक होते. पूर्व किना-यावरचे न्यू यॉर्क आणि पश्चिम किना-यावरचे सॅनफ्रॅन्सिस्को अमेरिकेतील ही दोन महत्त्वाची बंदरे. या बंदरांच्या परिसरांत व त्या जवळच्या राज्यांत वस्ती वेगाने वाढली. डाकोटा राज्य मध्य अमेरिकेत आहे. समुद्रापासून खूपच दूर. म्हणून व्यापाराच्या दृष्टीने गैरसोईचे. वस्ती करण्याच्या दृष्टीने हवामानही सुखावह नाही. हिवाळ्यात अति थंड. त्यामुळे मानवी वस्ती फार विरळ होती. डाकोटात जमीन मात्र सुपीक आहे. या जमिनीत मक्याचे पीक उत्तम येते हे दाखवून देण्यासाठी आणि लोकांनी त्या राज्यात शेती करण्यासाठी यावे असे आवाहन करण्यासाठी पहिल्यांदा कॉर्न पॅलेस तयार केला गेला.

१९०४-१९०५ जो पॅलेस होता त्याचे पूर्ण लाकडी बांधकाम होते. त्याच्या बाहेरच्या भिंती कणसांच्या वेगवेगळ्या डिझाइन्सनी सजवलेल्या होत्या. १९३७ साली पुनर्बांधणीसाठी हे काम एका आर्किटेक्चरल फर्मला दिले गेले. आज हा पॅलेस लाकडी नाही तर लोखंडी सळया व सिमेंटमध्ये बांधलेला आहे. त्यांनी या डिझाइन्समध्ये नवीन कांद्याच्या आकाराचे घुमट आणि मनोरे बांधले. त्यामुळे आपल्याला आजचा कॉर्न पॅलेस वैशिष्ट्यपूर्ण वाटतो.

मात्र या सिमेंटच्या भिंती विविधरंगी पूर्ण कणसांचा आणि वेगवेगळ्या धान्याचा उपयोग करून सुशोभित केल्या जातात. बारा रंगांची कणसे यात वापरली जातात. अर्थात सर्व रंगांची कणसे प्रत्येक वर्षाच्या डिझाइन्समध्ये असतातच असे नाही. त्या डिझाइनसाठी जेवढे रंग आवश्यक असतात तेवढ्या रंगांची कणसे वापरली जातात. येथे प्रत्येक वर्षी वेगवेगळी सजावट केली जाते आणि त्यासाठी प्रत्येक वर्षी १,३०,००० डॉलर्स खर्च केले जातात. नवीन कल्पना घेऊन दरवर्षी नवीन डिझाइन केले जाते. हे तयार करायचे काम तिथले स्थानिक कलाकार करीत असतात. २००६ साली इथे मोठा दुष्काळ पडला होता. त्यामुळे त्या वर्षी मात्र नवीन डिझाइन तयार केले गेले नाही.

<u>नैसर्गिक बारा रंगांच्या कणसांनी कॉर्न पॅलेस सजवतात</u>:

कार वेगाने मिचेल शहराकडे धावत होती. – आणि मिचेल आले ! आम्ही एकदम पॅलेससमोरच पोहोचलो ! मिचेल शहराच्या मेन रोडवरच हा कॉर्न पॅलेस आहे. कार थांबली. आम्ही उतरलो. समोर सुंदर कॉर्न पॅलेस ! रंगीबेरंगी ! डोळे विस्फारून आम्ही पाहतच राहिलो !

या पॅलेसच्या बाहेरच्या भिंती मक्याच्या कणसांनी तयार केलेल्या डिझाइन्सच्या होत्या. २००० साली आम्ही या शानदार राजवाड्यासमोर उभे होतो. ते वर्ष 'मिलेनियम इयर' म्हणून गाजत होते. त्यामुळे प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंच्या वर्तुळाकार स्तंभांवर '२०००' हा आकडा कणसांनी बनवलेला होता. दोन्ही स्तंभांच्या मध्यभागी असलेल्या प्रवेशद्वारावर वेगवेगळी मोठमोठी तीन रंगीत चित्रे दिसत होती. विविध नैसर्गिक रंगांच्या कणसांनी ही चित्रे तयार केली होती. दोन्ही स्तंभांच्या मध्यभागी आहे प्रवेशद्वार. प्रवेशद्वारावरही वेगवेगळी मोठमोठी तीन रंगित चित्रे दिसत होती. नैसर्गिक बारा रंगांच्या कणसांनी ही सर्व चित्रे साकारली होती व इतरही सर्व सजावट केली होती.

सर्वसाधारणपणे पिवळ्या रंगाची मक्याची कणसे असतात. अमेरिकेत अनेक रंगांचे दाणे एकाच कणसात असत. पुढे यावर अनेक वर्षे संशोधन होऊन वेगवगळ्या नैसर्गिक रंगांच्या कणसांच्या जाती विकसित करण्यात आल्या. म्हणून आज बारा विविध नैसर्गिक रंगांची कणसे या राजवाड्यासाठी वापरणे शक्य झाले. अशा सुशोभित केलेल्या कॉर्न पॅलसच्या मधल्या मोठ्या घुमटावर अमेरिकेचा झेंडा मोठ्या दिमाखात फडकत होता.

जमिनीच्या लेव्हल पासून झेंड्याच्या वरच्या टोकापर्यंतची राजवाड्याची उंची ८६ फूट असून राजवाड्याच्या घुमटाचा तळाचा घेर ६८ फूट आहे. एकूण बांधकामाचे क्षेत्र ४३, ५१२ चौरस फूट आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी वास्तुरचनेच्या क्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या रॅप्प ॲन्ड रॅप्प (Rapp & Rapp) या कंपनीने ह्या पॅलेसचे बांधकाम केलेले आहे. राजवाडा पाहण्यासाठी कोणतेही प्रवेशशुल्क मात्र आकारले जात नाही.

<u>कणसांत हरवले मी</u> ......

असा हा भव्य व सुंदर मक्याच्या कणसांचा राजवाडा पाहताना माझ्या न कळत मी त्या कणसांमध्ये हरवून गेले. त्या अगणित कणसांनी मला काही वेगळेच पण हवे हवे वाटणारे दाखवायला सुरुवात केली......

कणसांचा हंगाम आला की माझ्या सासूबाई कै.इंदिराबाई प्रभुणे कणीस खाण्यासाठी खूप उत्सुक असायच्या. वयाने पंचाऐंशी वर्षांच्या होई पर्यंत त्यांचे बत्तीसच्या बत्तीस दात अगदी सुस्थितीत होते. अगदी हेवा करावे असे.त्यांची आवड लक्षात ठेवून आम्हीही कणसे बाजारात दिसली की आणत होतो. आमचे लग्न झाल्यावर सुरुवातीला (लग्नानंतरच मी बाजारात जायला सुरुवात केली होती. लग्नाआधी जात नव्हते.) पहिल्यांदा जेव्हा आम्ही कणसे आणली तेव्हा सर्वांप्रमाणे सासूबाईंच्या नावचेही एकच कणीस आणले. पण एकच कणीस खाल्ल्याने त्यांना कणीस खाल्ल्यासारखेच वाटेना. यानंतर मग मात्र आम्ही प्रत्येकाच्या नावाची चार-चार कणसे आणू लागलो. आम्ही घरात एकूण सहा जण होतो. त्यामुळे कणसे आणायला जाताना आठवणीने भली मोठी पिशवी न्यावी लागायची. (कारण त्या काळात कॅरी बॅग्ज नव्हत्याच) माणशी चार कणसे आणायची म्हणून ६× ४ = २४ कणसे आणू लागलो. मजेत चवीने खाऊ लागलो. सासूबाई खुश झाल्या. आनंदात खाऊ लागल्या. त्यांच्या आनंदात आम्हीही सहभागी होऊ लागलो. ...... सासूबाई जाऊनही आता बरीच वर्षे झाली, पण अजूनही कणीस म्हटले की आम्हा सगळ्यांनाच त्यांची आठवण येते. आजही मन व्याकूळ होते.

- आणि आता तर आम्ही कणसांच्या राजवाड्यासमोर-पॅलेससमोर उभे होतो. त्यामुळे त्यांची प्रकर्षाने आठवण झाली. कणसांचा राजवाडा पाहून त्याही कशा खुश झाल्या असत्या हे डोळ्यासमोर आले. डोळे न कळत पाणवले.

मलाही कणसे खूप आवडतात. अगदी लहान असल्यापासूनच. आम्ही सहा भावंडे. त्यामुळे कणसे घरात आणली की पटकन प्रत्येकजण आपल्याला पाहिजे ते निवडायचा. (आमची दोन्ही मुले लहान असताना अशीच मजा करीत) आणि मग भाजलेले कणीस खाताना 'तुझे कसे, माझे कसे' म्हणत खायचे. खूपच मजा यायची. मी जेव्हा कणीस हातात घ्यायची तेव्हा हळू हळू कणसावरचे एकेक पान काढून वरच्या वरच मोकळे करायची. त्यात मला कमळाच्या फुलाचा भास व्हायचा. एकेक पाकळीच आपण अलगद मोकळी करतोय असे वाटायचे. नंतर आत दिसायच्या त्या रेशमाच्या मऊसूत लडी ! त्यांचा स्पर्श मुलायम वाटायचा. हवाहवा वाटायचा. हातात घेऊन तो स्पर्श बराचवेळ अनुभवायचा. नंतर मग त्या लडींना हळूच वहीत ठेवून द्यायचे. खूप दिवसांनी पाहिल्यावरही त्या छान वाटायच्या. कधी कधी भावलीचे मऊ मऊ सोनेरी केसच आपण हातात धरलेत असे वाटायचे. (आज अमेरिकेत पाहते तशा गो-यापान मुली तेव्हा कधी पाहिल्याच नव्हत्या) कणसातल्या ह्या रेशमी लडी काढून झाल्या की मग आतले कणीस दर्शन द्यायचे ! चमकणारे ओळीने उभे असलेले दाणे. कोवळे. ते कोवळे आहेत की नाहीत ते हे नख लावून पाहायचे. त्या लुसलुशीत दाण्यांना नख लावतानाही नख लावावे की नाही असे वाटायचे. नख लवले की त्यातून दूध बाहेर यायचे. असे कणीस निवडून घेता आले म्हणजे मन आनंदित व्हायचे. मग तूप-मीठ लावून चवीने खायचे. सगळ्यांनी मिळून खायचे. तुझ्यापेक्षा माझेच चांगले असे प्रत्येकाने म्हणायचे. कणसाच्या या आठवणीने मन उल्हसित झाले. बालपणात हरवून गेले. आता कणसांचा राजवाडा अधिकच जवळचा वाटू लागला. आपलासा वाटू लागला. नात्यातला वाटू लागला.

माझ्या सासूबाईंची जशी आठवण आली तशीच मी लहान असतानाची, मुले लहान असतानाची आठवण मनात दाटून आली. मक्याच्या कणसाचा राजवाडा पाहून मक्याच्या कणसाभोवती विणलेल्या आठवणी येऊन परत मी वर्तमानकाळात आले. ह्या राजवाड्याने जणू मला जुन्या काळात सहलीलाच नेऊन आणले आणि 'आता आठवणी पुरे. आता माझ्याकडे बघ. तुला आवडणा-या कणसांचाच मी बनलेलो आहे. मी  कसा आहे ते डोळे भरून पाहा. डोळ्यात भरून ठेव. मनात साठवून ठेव.' असेच जणू मला तो राजवाडा म्हणू लागला.

तेवढ्यात हे म्हणाले, " अगं, किती वेगवगळ्या रंगांची कणसं. किती सुंदर. किती भव्य." ह्यांच्या ह्या वाक्याने मी भानावर आले. खरंच किती विलक्षण वाटत होता तो कणसांनी बनवलेला राजवाडा. त्याचा तो मधला मोठा घुमट. आजूबाजूला असलेले मिनार. त्या सर्वांची साधलेली आकर्षक रंगसंगती. खिळवून ठेवणारी. राजवाड्याला शोभेलसा मोठा प्रशस्त दरवाजा. असं वाटत होतं की आत खरोखरीच कुणीतरी राजा आहे आणि त्याचा दरबार पाहायला त्याने आम्हाला आज बोलावले आहे. आमच्याकडून त्याला त्याचे आणि त्याच्या राज्याचे कौतुक ऐकून घ्यायचे आहे. आमच्या प्रमाणेच त्याने अजून खूप लोकांना असेच आमंत्रण देऊन बोलावले आहे. त्यामुळे लोक आत जाऊन त्याच्याशी बोलून उत्साहाने व आनंदाने बाहेर येत आहेत.... आता आमचेही बाहेरून राजवाड्याचे सौंदर्य पाहून

पोट भरले होते. आम्ही पण आता आपल्याला हा राजा काय काय सांगतो, काय काय दाखवतो अशी उत्सुकता वाटायला लागली आणि आम्ही आत जाण्यासाठी आत पाऊल ठेवले.

राजवाड्याच्या आत :





या राजवाड्याच्या आत खूप मोठे सभागृह आहे. त्या सभागृहात खूप पर्यटक दिसत होते. बाहेरून जशा भिंती कणसांनी सजवलेल्या आहेत तशा आतील भिंतीही कणसांनी सजवलेल्या आहेत. या सभागृहात कार्यक्रम सादर करण्यासाठी मोठा रंगमंच आहे. जेव्हा कार्यक्रम नसतात तेव्हा विविध आकर्षक वस्तू विक्रीला ठेवलेल्या असतात. सभागृहाच्या भिंतींवर कणसांनी तयार केलेली मोठमोठी चित्रे लावली आहेत. कणसांच्या डिझाइन्सने सजवलेल्या राजवाड्याचे मागील वर्षांतील मोठमोठे फोटो लावले आहेत. हे सर्व पाहताना खूप छान वाटत होते. दर वर्षी नवीन विचार, नवीन डिझाईन, नवीन चित्र, नवीन फोटो.

रंगमंचाच्या वरील भिंतीवर मध्यभागी हातात हात घेतलेले चित्र होते. त्याच्या दोन्ही बाजूंना





माणूस, पुस्तक, घर, म्हैस, घोडेस्वार, पक्षी अशी जिवंत वाटतील अशी चित्रे होती. मैत्रीचा, मानवी कर्तृत्वाचा, ज्ञानाचा, मानवी वस्तीचा, कृषिसंस्कृतीचा, पक्षिप्रेमाचा संदेश देणारी चित्रे बघताना आनंद वाटत होता. भरघोस आलेले पीक गाडीत भरून नेतानाचे शेतक-याचे मोठ्या आकारातील चित्र बाजूच्या

भितींवर होते, अन्य चित्रांत माणसे गप्पा मारत बसलेली, शेकोटी पेटवून शेकत बसलेली बसलेली माणसे, पेरणी करणारे शेतकरी, शिकार करणारे शिकारी अशी बरीच चित्रे तिथे सभागृहाची आकर्षकता वाढवीत होती. रात्रीच्या वेळी विजेची रोषणाई करून हा राजवाडा अधिकच सुशोभित करतात.





असा हा विलक्षण राजवाडा पाहण्यासाठी जगभरातून दरवर्षी ५,००,००० लाख पर्यटक भेट देत असतात. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी दरवर्षी येथे Corn Festival म्हणजे 'कणसोत्सव' होत असतो. जगातले पर्यटक याला मोठ्या संख्येने गर्दी करीत असतात.

एकूण हे सगळे पाहिल्यावर 'आमच्या राज्यात या आणि येथे येऊन येथील सुपीक प्रदेशात धान्य पिकवा' हे जे साउथ डाकोटा वासीयांचे आवाहन आहे ते किती यथार्थ आहे याची साक्ष पटते.

आम्ही अमेरिकेतला हा सुंदर राजवाडा पाहायला गेलो. अति उत्सुकतेने डोळेभरून हा कणसांचा राजवाडा पाहिला. राजवाड्याच्या आठवणी मनात साठवत व पुन्हा बघायला जायचे बेत आखत प्रसन्न मनाने, आनंदाने त्याला टा ऽ टा करून आम्ही पुढचा प्रवास सुरू केला.

- सौ. उषा प्रभुणे
usha_prabhune@yahoo.com

© 2009 Usha Arun Prabhune